डॉ. (श्रीमती) सुमन कृ. बुवा
बी.कॉम.,एम.एस.डब्लु.,डी.ए.ई.,डी.पी.ई.,पी.एच.डी.
Dr. (Smt.) Suman K. Buwa,
B.Com., M.S.W., D.A.E., D.P.E., Ph.D.I/c.
I/c DIRECTOR

Estd. 1962
NAAC "A" Grade
MHRD-NIRF-28th Rank

आजीवन अध्ययन व विस्तार विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
DEPARTMENT OF LIFELONG LEARNING AND EXTENSION,
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004

एसयु/एसीई/ No 364

दि. २४/०४/२०१७

25 APR 2017

प्रति,
मा. प्राचार्य,
कला व वाणिज्य महाविद्यालय,
सातारा.

**विषय:- मोडी लिपी प्रशिक्षण अभ्यासक्रम (१ महिना कालावधी) सुरु करण्याबाबत...**

महोदय,

आपण मागणी केल्याप्रमाणे आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत आपणास **मोडी लिपी प्रशिक्षण अभ्यासक्रम (१ महिना कालावधी)** सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तरी, खालील बाबींची पूर्तता करुन सदरचा वर्ग सुरु करण्याबाबत कार्यवाही सुरु करावी.

१. प्रवेश अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेच्या दाखल्याची सत्यप्रत जोडून प्रवेश अर्ज आपल्याकडे ठेवावते.
२. वर्गात ८०टक्के उपस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच परीक्षेस बसता येईल.
३. अभ्यासक्रमात दिल्याप्रमाणे थेअरी व प्रात्यक्षिक तास घेण्यात यावेत.
४. सदरचा वर्ग एप्रिल/मे २०१७ पासून सुरु होणे आवश्यक आहे.
५. महाविद्यालयाकडे जमा होणाऱ्या **शैक्षणिक** शुल्काच्या २० टक्के शुल्क (रु. ५००/- च्या प्रमाणात) आणि प्रवेश शुल्क प्रत्येकी रु. २५/- व माजी विद्यार्थी संघटना शुल्क प्रत्येकी रु. २५/- या प्रमाणे मा. वित्त व लेखाधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. यांच्या नावे डी.डी. काढून अथवा विद्यापीठाच्या बॅंक खात्यावर दि. ७५ एप्रिल, २०१७ पर्यंत भरुन विभागात त्याचे चलन जमा करावे.
६. विद्यार्थ्यांची पत्त्यासहित (इंग्रजी/मराठी) तसेच अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त भटक्या जमाती या संवर्गाचा उल्लेख करुन यादी व वेळापत्रक तसेच शिक्षकांची नावे व पत्त्यासहित यादी (सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात) विभागाकडे पाठवून द्यावे.
७. प्रवेशावेळी दिलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीमधील नावांमध्ये नंतर कोणताही बदल करण्यात येणार नाही. किंवा एका विद्यार्थ्याच्या नावा ऐवजी दुसऱ्या विद्यार्थ्याच्या नावाचा समावेश करता येणार नाही.
८. अभ्यासक्रमाचे रेकॉर्ड, जमा-खर्चाच्या नोंदी स्वतंत्रपणे ठेवाव्यात आणि विद्यापीठाने मागणी केल्यास त्याची पूर्तता करावी.
९. विभागाच्या नियमांचे पालन होत नाही असे निदर्शनास आल्यास आपल्याला अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत दिलेली मान्यता काढून घेतली जाईल.
१०. वर्ग सुरु करण्यापूर्वी किमान ७ दिवस अगोदर विभागात लेखी कळविणे आवश्यक आहे.

श्री. जी. जी. कात्कर
पुढील कार्यवाही करणे
26.4.17

ARTS AND COMMERCE COLLEGE
Inward No. 27/69
Date: 27 APR 2017

Scanned by CamScanner

११. तज्ज्ञ व्यक्ती, प्रकल्प अधिकारी, शिपाई मानधन व इतर खर्चाच्या तपशीलासाठी सोबत जोडलेले आर्थिक प्रारुप पाहुन त्यानुसार प्राचार्यांच्या मान्यतेने योग्य ती कार्यवाही करावी.

१२. सदर अभ्यासक्रमाच्या **माहितीपत्रकाची (Prospectus) किंमत रु. ५०/-** असून ते **शिवाजी विद्यापीठ कंझ्यु. स्टोअर्स (ॲनेक्स बिल्डींग)** येथे विक्रीस आहे. माहितीपत्रके विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात डी. डी. अथवा रोख रक्कम अदा करुन घेण्यात यावे.

१३. अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी किमान १० विद्यार्थी संख्या आवश्यक आहे.

१४. सर्व प्रत्रव्यवहार मा. प्राचार्य/संचालक यांच्या सहीनेच करण्यात यावा.

१५. अपुरी माहिती व योग्य त्या कागदपत्रांची पुर्तता नसल्यास कोणत्याही कागपत्रांचा स्वीकार केला जाणार नाही.

१६. अभ्यासक्रमाचे शुल्क विद्यापीठात जमा करण्यापुर्वी प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभागामध्ये नोंद करुन व योग्य तो शेरा घेवुन शुल्क **विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीमधील रोकड विभागात (खोली क. १०७)** कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक आहे. त्यानंतर जमा पावतीची एक प्रत व सर्व अनुशंगीक कागदपत्रे विभागात जमा करावी.

१७. अभ्यासक्रम पुर्ण झाल्यानंतर परीक्षा घेण्यापुर्वी विभागाकडे विहित केलेले परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. तसेच परीक्षा घेण्यापुर्वी विभागाकडे त्याबाबत किमान १५ दिवस अगोदर लेखी कळविणे आवश्यक आहे.

१८. सदर अभ्यासक्रमाच्या परीक्षेच्या वेळापत्रकात बदल करण्यात येणार नाही हे प्रवेशावेळी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.

आपण दिलेल्या सहकार्याबद्दल आभारी आहे आणि यापुढेही आपला सततचा सहभाग मिळावा. ही अपेक्षा.

कळावे,

आपला विश्वासू,

(श्रीमती (डॉ.) सुमन बुवा)
प्र.संचालक व विभागप्रमुख

सोबत :- १. प्रवर्ग नमुना तक्ता
२.अभ्यासक्रम सुरु करावयाच्या पत्राचा नमुना
३.. आर्थिक प्रारुप

Tel. : (Office) (0231) 2609151, (I/c. Director) (0231) 2609150, Mobile - 9011001514E-mail : skbuwa@ymail.com

Scanned by CamScanner